# अहमदनगर येथील मे.चिफ ज्युडिशिअल मॅजीस्ट्रेट साहेब, वर्ग-१ यांचे कोर्टात..

10676 एस.सी.सी.नंबर /२०२४.

फिर्यादी

श्री साई मल्टीस्टेट को.ऑप.ॲग्रीकल्चरल
सोसायटी लि.पारनेर, ता.पारनेर, तर्फे
श्री.दत्तात्रय पांडुरंग पवार, वय - ४३ वर्षे,
धंदा – नोकरी, रा. मु.पो.भांडगाव, ता.पारनेर,
जिल्हा अहमदनगर
मो.नं.८८८८६८६४५८

आरोपी

वामन महादु राठोड
वय- सज्ञान, धंदा-शेती,
रा.भोकरदरा, ढवळपुरी,
ता.पारनेर, जि.अहमदनगर.
मो.नं.८९७२३६८११७.

**फिर्याद** :- निगोशिएबल इन्स्ट्रयुमेंट ॲक्ट 'कलम १३८' प्रमाणे :-

याकामी फिर्यादी कळवितात ते येणेप्रमाणे :-

**-: परिशिष्ठ :-**

| | | |
|---|---|---|
| १ | चेक देणाराचे नाव | वामन महादु राठोड |
| २ | चेक नंबर व तारीख | '१०११३३' दि.१५/०६/२०२४ |
| ३ | चेक रक्कम रुपये | ९१,९८३/- (अक्षरी रक्कम एक्याण्णव हजार नऊशे त्र्याऐंशी रूपये मात्र) |
| ४ | चेक दिलेली बँक | 'महाराष्ट्र ग्रामीण बँक, शाखा-ढवळपुरी, ता.पारनेर, जि.अहमदनगर-४१४१०३.' |
| ५ | चेक भरलेली बँक | 'जीएस महानगर को-ऑप.बँक लि., शाखा- |

| | | |
|---|---|---|
| | | मार्केट यार्ड, अहमदनगर, ता.जि.अहमदनगर' |
| ६ | चेक परत आल्याची तारीख व कारण | दिनांक २८/०८/२०२४ 'Funds Insufficient' |
| ७ | नोटीस पाठविल्याची तारीख | २६/०९/२०२४ |
| ८ | आरोपीस नोटीस मिळाल्याची तारीख | ०१/१०/२०२४ |
| ९ | गुन्ह्याचे कारण | तारीख २८/०८/२०२४ रोजी चेक न वटता परत आला असता फिर्यादी यांनी आरोपीस नोटीस पाठवुन चेकचे रक्कमेची मागणी करुनही आरोपीने मुदतीत चेकची रक्कम आणून दिली नाही. |

१) फिर्यादी श्री साई मल्टीस्टेट को.ऑपरेटिव्ह ॲग्रीकल्चरल सोसायटी लि.पारनेर, ता.पारनेर जिल्हा अहमदनगर ही संस्था दि मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीज् ॲक्ट २००२ नुसार नोंदणीकृत स्थापन झालेली सहकारी संस्था असून तिचा कारभार त्याच कायदयानुसार तसेच पोटनियमानुसार चालतो. फिर्यादी संस्थेमार्फत तिचे सभासदांना शेती व्यवसाय, शेती खरेदी व शेती संबंधीत कामकाजाकरीता तसेच इतर वेगवेगळया कारणांसाठी कर्ज पुरवठा केला जातो.

श्री.दत्तात्रय पांडुरंग पवार, रा.मु.पो.भांडगाव, ता.पारनेर, जि.अ.नगर हे फिर्यादी संस्थेमध्ये शाखा व्यवस्थापक म्हणुन काम पाहतात. त्यांना संस्थेच्या वतीने संस्थेकरिता नोटीसा पाठविणे, फिर्याद दाखल करणे, फिर्यादीवर सह्या करणे, प्रतिज्ञालेख करणे, वकीलपत्रावर सह्या करणे, पुरावा दाखल करणे, जबाब देणे, तडजोड करणे व सदर फिर्यादकामी सर्व काम पाहणे इ.साठी फिर्यादी संस्थेने अधिकार दिलेले आहेत. अधिकार पत्राची प्रत सोबत दाखल केलेली आहे व त्या अधिकारात फिर्यादी संस्थेकरीता सदरची फिर्याद आणलेली आहे.

२) कर्जदार नामे – शिवाजी पुनाजी पवार या फिर्यादी संस्थेच्या सभासद असून सदर कर्जदार यांनी फिर्यादी संस्थेची शाखा – ढवळपुरी, ता.पारनेर, जि.अहमदनगर या शाखेकडुन शेतीसाठी कर्ज रक्कम मिळावी म्हणुन कर्जाची मागणी अर्जाद्वारे सर्व कागदपत्रांची पुर्तता करुन केली होती. त्यामुळे कर्जदार नामे शिवाजी पुनाजी पवार यांना दिनांक २०/१०/२०२० रोजी रक्कम रुपये १,००,०००/- (अक्षरी रक्कम एक लाख रूपये मात्र) चे कर्ज १७ % व्याजदराने कर्ज प्रकरणांतील अटी व शर्तीयर मंजुर करुन सदरची रक्कम कर्जदार नामे– शिवाजी पुनाजी पवार यांना अदा करणेत आलेली होती व आहे. सदर कर्जास आरोपी जामीनदार होते व आहेत. सदर कर्जाची फेड आरोपी व सदर कर्जदार नामे – शिवाजी पुनाजी पवार यांनी त्यावरील होणारे व्याजासहित ठराविक मुदतीत करण्याचे मान्य व कबुल केलेले होते व आहे व त्याप्रमाणे सदर कर्जदार व आरोपी यांनी कर्जाची परतफेड न करता कर्ज प्रकरणामधील अटी व शर्तीचा भंग करत कर्जाची रक्कम रुपये ९१,९८३/- (अक्षरी रक्कम एक्याण्णव हजार नऊशे त्र्याऐंशी रूपये मात्र) दिनांक ०८/०६/२०२४ रोजी अखेर पर्यंत थकविलेली आहे.

सदरचे कर्ज घेतेवेळी सदर आरोपी हे सदर कर्जास जामीनदार असल्यामुळे सदर कर्ज भरण्याची जबाबदारी आरोपीचीही होती व आहे. म्हणुन फिर्यादी संस्थेने आरोपीकडे एकुण थकीत कर्ज रकमेची अनेकवेळा मागणी केली असता आरोपीने सदर कर्जाची परतफेड करण्यासाठी थकीत असलेल्या रक्कमेपोटी आरोपीचे खाते असलेल्या 'महाराष्ट्र ग्रामीण बँक, शाखा-ढवळपुरी, ता.पारनेर, जि.अहमदनगर-४१४१०३.' या बँकेचा चेक नंबर '१०११३३' रक्कम रुपये ९१,९८३/- (अक्षरी रक्कम एक्याण्णव हजार नऊशे त्र्याऐंशी रूपये मात्र) चा दि.१५/०६/२०२४ रोजीचा

चेक आरोपी यांनी स्वत: सही करून फिर्यादी संस्थेचे नावे दिला होता व सदरचा चेक खात्यात भरल्यानंतर तो निश्चित वटेल अशी खात्री व भरवसा दिलेवरुन फिर्यादी संस्थेने आरोपीचे शब्दावर विश्वास ठेवून सदरचा चेक स्विकारला.

३) सदरचा चेक हा फिर्यादीने आरोपीचे सांगण्यावरुन फिर्यादी संस्थेचे खाते असलेल्या 'जीएस महानगर को-ऑप.बँक लि., शाखा-मार्केट यार्ड, अहमदनगर, ता.जि.अहमदनगर' येथे दिनांक २२/०८/२०२४ रोजी भरला असता सदर चेक 'Funds Insufficient' या शे-यासह न वटता मेमोसह दिनांक २८/०८/२०२४ रोजी परत आला.

अशा प्रकारे आरोपीने आरोपीचे खात्यावर पुरेशी रक्कम शिल्लक नाही याची माहिती व जाणीव असुनही जाणीवपुर्वक न वटणारा चेक देवून फिर्यादी संस्थेची फसवणूक केलेली आहे. सदरचा चेक आरोपीने त्याच्याकडे असणारे कायदेशीर देणे देण्यासाठी व जबाबदारी पार पाडण्यासाठी फिर्यादीस दिलेला होता व आहे.

४) सदरचा चेक फिर्यादीस न वटता परत आल्यानंतर फिर्यादी संस्थेने आरोपीला त्याचे पत्यावर योग्य त्या मुदतीत अॅडव्होकेट वाय.व्ही. भालेकर यांचेमार्फत रजि.पोस्टाने चेक न वटलेबाबतची नोटीस दि.२६/०९/२०२४ रोजी पाठविण्यात आली होती. सदर नोटीस आरोपीस दि.०१/१०/२०२४ रोजी मिळाली असून सदर नोटीसीस आरोपीने अदयापपर्यंत कोणतेही उत्तर दिलेले नाही. सदर नोटीस आरोपीस मिळुनही आरोपीने चेकची रक्कम फिर्यादी यांना दिलेली नाही अगर भरणा केलेली नाही.

५) अशा प्रकारे आरोपीचा फिर्यादी संस्थेस फसविण्याचा मानस व हेतु होता म्हणुनच त्याने जाणीवपुर्वक सदरचा न वटणारा चेक दिल्याने व त्याचा अनादर झालेने तसेच सदर नोटीस आरोपीस मिळुनही आरोपीने चेकची रक्कम फिर्यादी यांना दिलेली नाही अगर भरणा केलेली नाही. अशा प्रकारे आरोपीने फिर्यादी संस्थेची आर्थिक घोर फसवणुक

केलेली आहे व आरोपीने **'निगोशिएबल इन्स्ट्रयुमेंट'** अॅक्ट कलम १३८ प्रमाणे गंभीर स्वरुपाचा गुन्हा केलेला आहे. म्हणून सदर फिर्यादीची आरोपी विरुध्द सदरची फिर्याद आहे.

सबब आरोपीने केलेल्या गुन्ह्याची चोकशी होवुन त्यास कडक शासन व्हावे व दंडाचे रक्कमेतुन फिर्यादीस चेकची रक्कम अदा करण्याचा आदेश व्हावा व फिर्यादी संस्थेस न्याय मिळावा व काही महत्वाची कागदपत्रे आजरोजी दाखल करत आहोत त्यांना निशाणी नं. देऊन पुराव्याकामी वाचण्यात यावीत.

**६) याकामी फिर्यादी तर्फे साक्षीदार खालीलप्रमाणे :-**

अ)शाखाधिकारी, 'महाराष्ट्र ग्रामीण बँक, शाखा-ढवळपुरी, ता.पारनेर, जि.अहमदनगर-४१४१०३.'

ब)शाखाधिकारी, 'जीएस महानगर को-ऑप.बँक लि., शाखा-मार्केट यार्ड, अहमदनगर, ता.जि.अहमदनगर'

साक्षीदार क्र. 'अ' व 'ब' यांनी साक्षीस येतांना माहितीगार इसमांस हजर ठेवणे व येतांना सदर आरोपीचे खात्याबाबत तसेच आरोपीने फिर्यादीस दिलेला वरील चेक फिर्यादीने त्यांचे खात्यात भरला असता तो न वटता परत आला त्या संदर्भातील सर्व माहिती व कागदपत्र घेऊन साक्षीस हजर रहावे.

येणेप्रमाणे फिर्यादी तर्फे तुर्त साक्षीपुरावा असे आवश्यकतेप्रमाणे जादा पुरावा लागल्यास अथवा साक्षीदार तपासणेस मे.कोर्टाची परवानगी असावी.

वरील संपूर्ण मजकूर हा माझे माहिती व समजूती प्रमाणे खरा व बरोबर असून त्याचे सत्यतेसाठी आज रोजी अहमदनगर मुक्कामी त्यावर माझी सही / निशाणी आंगठा केला असे.

येणेप्रमाणे फिर्याद असे.

तारीख :- १४/११/२०२४.

ॲडव्होकेट.

फिर्यादी

Reg No MSCS/CR/ 300/2011

## सक्षिप्त फौ. ख. नं.१०६७६/२०२४

**निशाणी १ वरील आदेश**

फिर्याद, त्या सोबतची सर्व कागदपत्र तसेच फिर्यादीचे शपथपत्र यांचे अवलोकन केले. फिर्यादीतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. फिर्यादीने परक्राम्य लेख अधिनियम १८८१ चे कलम १३८ (Negotiable Instruments Act, 1881) अन्वये आरोपीविरुध्द प्रस्तुतची केस चालविणेसंबंधी प्रथमदर्शनी केस असल्याचे दर्शविलेले आहे. त्यामुळे प्रस्तुत केसमधील आरोपीस परक्राम्य लेख अधिनियम १८८१ चे कलम १३८ अन्वयेच्या अपराधाबद्दल समन्स काढण्यात यावे.

फिर्यादीने प्रोसेस व इतर संबंधीत बाबींची पूर्तता करावी. समन्स परतीचा पुढील दिनांक / /२०२४ नेमणेत आला आहे.

मा.सर्वोच्च न्यायालय यांनी दामोदर एस. प्रभू विरुध्द सय्यद बाबालाल, ए.आय.आर.२०१० सुप्रिम कोर्ट १९०७ या न्याय निर्णयामध्ये दिलेल्या मार्गदर्शक तत्तवानुसार आरोपी विरुध्द समन्स पाठविण्यात यावे.

IRSHAD MOHMADRAFIK NAIKWADI

Digitally signed by IRSHAD MOHMADRAFIK NAIKWADI
Date: 2025.01.10 10:50:48 +0530

दिनांक – ०९/०१/२०२५
अहमदनगर

**(ई.मो.नाईकवाडी)**
अति.मुख्य न्यायदंडाधिकारी
(न्यायालय क्र.०७), अहमदनगर.